महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२४-२५/327 दिनांक:- 30 JAN 2025

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय:-शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांचे अर्ज भरून मंजुरी करिता पाठविण्याबाबत.**

**संदर्भ**:- मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे अध्यक्षतेखाली विभागीय स्तरावर दि.२५/०१/२०२५ रोजी झालेली बैठक

महाडिबीटी पोर्टलवरील निर्देशित केल्यानुसार **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता,** महाडिबीटी पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज (नवीन /नुतनीकरण ) भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्याअनुषंगाने संस्थेत प्रवेशित नवीन /नुतनीकरण विद्यार्थ्यांचे अर्ज भरून घेण्याकरिता आपणास या कार्यालयाव्दारे वारंवार सुचित करण्यात आलेले आहे. परंतु डॅशबोर्ड नुसार अद्याप पर्यंत ब-याच नवीन विद्यार्थ्यांनी अर्ज नोंदणी न केल्याचे तसेच नुतनीकरण / त्रुटी अभावि परत करण्यात आलेले अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आलेले आहे. **याबाबत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांनी तिव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.**

उपरोक्त बैठकीच्या अनुषंगाने आपणास सुचित येते की, आपल्या संस्थेतील प्रवेशित शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ लवरात लवकर प्राप्त करून घेण्याकरिता संस्था स्तरावरून योग्य ती कार्यवाही तसेच अर्जाची तपासणी करून शिष्यवृत्तीचे अर्ज निकाली काढण्यात यावे. अर्ज प्रलंबित अभावि विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्राचार्याची राहील, याची नोंद घ्यावी.

**(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर